# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड
# ८ वे गिरिमित्र संमेलन ११-१२ जुलै २००९
# मध्यवर्ती संकल्पना - गिर्यारोहणातून सामाजिक बांधिलकी

कधी तरी सहजच तर कधी कोणाच्या आग्रहाखातर आपण ट्रेकला जातो आणि त्यातला निखळ आनंद अनुभवल्याने गिर्यारोहण हा आपला छंदच बनतो. पहाता पहाता हे डोंगरांचं वेड आपल्याला एका वेगळ्याच उंचीवर घेउन जातं. या विशाल निसर्गात भटकताना आपला दृष्टीकोनही व्यापक होऊ लागतो. त्याला जाणवते ते दुर्गम भागातल्या वाडावस्त्यातील खडतर जीवन, निसर्गाच्या आणि मानवाच्या दुहेरी आघातांनी ढासळणारे आपले दुर्गवैभव. असे एक ना दोन अनेक प्रश्न. अशीच कुठुनतरी सुरवात झाली आणि पाहता पाहता गिर्यारोहकांच्या सामाजिक बांधिलकीतून एक एक प्रकल्प उभे राहीले.
डोंगराकडे केवळ छंद म्हणून, गिर्यारोहणाकडे क्रिडाप्रकार म्हणून पाहण्यास 50 चे दशक उजाडावं लागलं. साधारण 1975 च्या काळापर्यंत डोंगरद-या, गडकिल्ले भटकणे, त्यावर लिखाण करणे, नकाशे काढणे व या माध्यमातून त्यांचे दस्तऐवजीकरण करणे यावरच बराचसा भर होता. पण त्या काळातदेखील पुण्यातला एक अवलीया आपल्या परीने गिरीजनांची सेवा करत होता. बापूकाका उर्फ डॉ जी. आर. पटवर्धन यांची दर रविवारी सिंहगडची वारी ठरलेली. आपल्या ज्ञानाचा गिरीजनांना उपयोग व्हावा म्हणून ते गडावरून कल्याणला उतरायचे, गावातील लोकांवर औषधोपचार करायचे आणि परत गड चढून डोणज्याला उतरून पुण्याला परतायचे.
याच काळात अतिशय मेहनतीने केलेल्या गडकिल्ल्यांच्या छायाचित्रणाचा उपयोग जनसामान्यात जागृती व्हावी म्हणुन बापू गणपुले सारखा दुर्गप्रमी या छायाचित्रांचे प्रदर्शन सर्वदूर पोहचविण्याचा प्रयत्न करत होता. अमरहिंद मंडळाच्या आर्थिक पाठींब्यावर उभे राहीलेले हे प्रदर्शन 1986 मध्ये पार अंदमानपर्यंत पोहचले होते. भांडूपच्या जिप्सी हायकर्सच्या कार्यर्कत्यांनी यासाठी बरीच मेहनत घेतली होती.
1972 मध्ये ईर्शाळगडावर झालेल्या एका गिर्यारोहकाच्या अपघाती मृत्यूमुळे ठाण्यातले काही गिर्यारोहक या माचीवरील आदीवासींच्या जवळ गेले. शरद ओवळेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसेवादलाच्या गिरीविहार पथकाने माचीच्या विकासासाठी पुढे जाणीव या एका संस्थेची स्थापनाच केली. पिण्याच्या पाण्याची मुलभूत सोय नसणा-या या ठीकाणी मग 1985 मध्ये विहीरीचे बांधकाम करण्यात आले. गिरीजनांसाठी प्रत्येक रविवारी खास वैद्यकिय शिबिरं, आर,जे. मेहता कामगार चळवळीचा फिरता दवाखाना अशा मुलभूत सुविधा तब्बल 20 वर्षे नियमितपणे पुरवण्यात जाणीवचे मोलाचे योगदान आहे. 1998 मध्ये शाळा बांधल्यामुळे स्वातंत्र्यानंतर तब्बल 50 वर्षांनी वाडीवर ज्ञानकिरणे पोहचली. 2002 मध्ये संस्थेने या डोंगरवस्तीवर सौरउर्जेचा प्रकल्प यशस्वी करून सारी वस्ती प्रकाशमान केली. अलीकडच्या काळात येउरच्या जंगलातील आदीवासींसाठी संस्थेचे कार्यकर्ते झटत आहेत. येऊरमधील पाच वर्षाच्या मुलाच्या दुभंगलेल्या टाळूवरील गुंतागुंतीची शस्त्रक्रियासुद्धा यशस्वी करण्यात आली.
70 च्या दशकात अशाच एका दुर्गम वस्तीवर दुर्गप्रेमींनी साकारलेला प्रकल्प म्हणजे राजमाची ग्रामसहाय योजना. निसर्गसौंदर्याची लयलूट असणा-या राजमाचीवरील उधेवाडी हे गाव मात्र अतिशय मागासलेले होते. 1976 पासून येथे नियमित भेटी देउन शिवराय मंडळ, रिझर्व बॉंकेतील कर्मचारी व इतर समविचारी तरुणांनी या माचीला विकासाकडे नेण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक गरज होती ती आरोग्याची. त्यामुळे स्वच्छतेच्या सवयींसाठी अगदी साबणापासून ते विविध औषधोपचाराच्या सुविधा पुरविण्यावर भर दिला होता. गावात शाळा नव्हती, पाण्याची व्यवस्था नव्हती. पण संस्थेच्या कार्यर्कत्यांनी जणू गावाला दत्तकच घेतले होते. मनोरंजन किल्ल्यावरची टाकेसफाई, पुढे माचीवरच्या भल्यामोठया तळ्यातील गाळ उपसला. मनोरंजनवरून नळाद्वारे पाण्याची सोय

केली. जवळच्याच भैरोबा मंदिरात शाळेचा श्रीगणेशा झाला. 1979 मध्ये गावाजवळच शाळेची नवीन इमारत बांधण्यात आली. ह्या कामात गावक-यांचा तर सहभाग असायचाच पण विविध संस्थेतील ट्रेकर्सही उत्साहाने यायचे. संपूर्ण शैक्षणिक साहित्य पुरवणे, पोषक आहार अशा प्रकारच्या पूरक योजना राबण्यात आल्या. पुढे ही शाळा मावळातील आदर्श शाळा म्हणून गौरविण्यात आली.
1974-75 च्या दरम्यान जिप्सी हायकर्स असं अफलातून नाव धारण केलेली भांडूपची तरूण मंडळी आपल्या भटकंतीत गडसफाईची छोटीमोठी कामं करीत होती. पण 1980 च्या दरम्यान माथेरानवरील हश्र्याची पट्टी येथील अवघड वळणाच्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाच्या निमित्ताने आपण असे काम गडकिल्ल्यांवर करू शकतो याची त्यांना जाणीव झाली. यातूनच टाकेसफाई, गडकिल्ल्यांच्या दरवाजांची, तटबंदीची सफाई अशा कामांची सुरवात झाली. 1992 च्या दरम्यान विनय हिगोणीकर व सहका-यांच्या सहायाने स्थापन झालेल्या दुर्गमित्र या संघटनेने दुर्गसंवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील कार्याला ख-या अर्थाने दिशा दिली. महत्वाचे म्हणजे यामध्ये महाराष्ट्रातल्या सर्वच संस्थांच्या कार्यकर्त्यांचे पाठबळ होते. विविध संस्थांमधून सुमारे 400 - 500 कार्यकर्ते यात सामील झाले होते. 92 - 99 दरम्यानच्या कालावधीत मुख्यत आपल्या जवळच्याच माहूली (आसनगाव), पेठ (कर्जत) तिकोना अशा किल्ल्यांवरील कामांना जोर आला. सात वर्षात तब्बल 40 - 50 श्रमदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. कोथळीगडावरील पाय-यांवर वर्षानुवर्षे साचून राहीलेली माती दूर करून त्या प्रशस्त केल्या गेल्या तसेच गडावरील टाकेसफाई, गुहांची स्वच्छता करण्यात आली. माहूलीवर एकेकाळी प्रशस्त असणा-या देवडयादेखील अशाच मातीने भरलेल्या तर पाण्याच्या टाक्यांची पुरती वाट लागलेली. श्रमदान तसंच ग्रामस्थांना मजूरी देउन यामध्ये सामील करून या वास्तूंची निगा राखण्याचा प्रयत्न केला.
दुर्गसंवर्धनातून इतिहासचे जतन करत आणि सामाजिक बांधीलकी जोपासण्याच्या कार्यात पुढे अनेक संस्थांनी विविध प्रकारे योगदान दिलं. निसर्गमित्रने पालीनजीकच्या किल्ले सुधागडवर असाच जोर लावला होता. रायगडच्या महादरवाजाशी सार्धम्य असणा-या महादरवाज्यातून एकेकाळी फक्त रांगतच जाता येइल इतका मोठा मातीचा थर होता. पण 1987-90 च्या दरम्यानच्या श्रमदानामुळे महादरवाजास मोकळा श्वास घेता आला. तर 2005-06 साली डोंबीवलीच्या क्षितीज ग्रुपने उर्वरीत माती उपसून हे काम पुर्णत्वास नेले व महादरवाजाची शान राखली. निसर्गमित्रने महादरवाजावरोवरच गडावर टाकेसफाई नियमितपणे सुरू केली होती. आज हाच वारसा क्षितीजचे कार्यकर्ते कधी निसर्गमित्रच्या बरोबरीने तर कधी डोंबीवलीच्या दुर्गमित्रच्या जोडीने पुढे नेत आहेत. गिरिविहार या संस्थेने आपल्या शिबिरांच्या माध्यमातून 1997 ते 2004 पर्यंतच्या काळात गडसफाई, धोंडश्याकडील वाटेची सफाई, टाके सफाईचे काम पुढे चालू ठेवले. निसर्गमित्रने पुढच्या काळात प्रबळगड, कर्नाळा, ईर्शाळ, सोंडाई अशा आपल्या परीसरातील किल्ल्यांवरील पाण्याच्या टाकेसफाईत सातत्य राखले. सुधागडावरील भोराईचे मंदिर, दिपमाळ व उद्धस्त अवशेषांची साफसफाई व निगा राखण्याचे काम निसर्गमित्रने धोंडसे ग्रामस्थांच्या सहकार्याने केले होते. इगतपुरीनजीकच्या त्रिंगलवाडी किल्ल्याचा कोकण दरवाजादेखील असाच मातीने भरलेला होता. तब्बल 15 श्रमदान शिबिरांनंतर कल्याणच्या शिवगर्जना गिरीभ्रमण संस्थेने ही माती साफ करण्यात यश मिळवलं. मालाड च्या नेचर लव्हर्सने तांदूळवाडी किल्ल्यावर 1995 ते 2004 दरम्यान नियमितपणे टाकेसफाईचे काम हाती घेतले होते तर राजगड प्रदक्षिणेच्या माध्यमातून गेली 23 वर्षे गडसफाई आणि पाणीटाकेसफाई केली जात आहे. स्लिपर हायकर्स गेली 24 वर्षे दर महाशिवरात्रीला तिकोना किल्ल्यावर गडसफाई गडजागरण असे उपक्रम करीत आहेत.
दुर्गसंवर्धनाचे कार्य तसे अवघड आणि सातत्य राखण्यास अवघड. पण आजची तरूणपिढीदेखील यात चांगल्याप्रकारे कार्यरत आहे इतकंच नव्हे तर नवनवीन संकल्पनांचा वापर करीत आहे. मुंबईनजीकच्या वसईच्या भुईकोटासाठी गेली 3 वर्षे श्रीदत्त राऊतची किल्ले वसई मोहीम काम करतेय. 2004 पासून प्रत्येक रविवारी किल्ल्यास भेटी देऊन किल्ल्यातील हनुमानाच्या मंदिराचे संवर्धन तर 553 फूटी भुयाराचा मागोवा घेउन स्वच्छता

असे उपक्रम करण्यात आले. वसई विजय दिनाचा कार्यक्रम दिमाखात साजरा होउ लागला. इतकेच नाही तर वसईकिल्ल्याच्या संवर्धनाच्या कामी सरकाराशी झगडण्यास संस्थेने मागेपुडे पाहिले नाही. वसईबरोबरच परिसरातील अर्नाळा ,माहीम,केळवे भुईकोट अशा ठिकाणी संस्थेच्या कामाचा विस्तार झाला आहे.
गुहागरनजीकच्या गोपाळगडासंदर्भात विक्रोळीच्या गिरीमित्र प्रतिष्ठानची तर शासनाबरोबर चक्क लढाईच सुरू आहे. गोपाळगडाच्या खाजगी मालकीची कुणकुण लागल्यावर माहीतीचा अधिकार व स्थानीकांची मदत घेत दोन वर्षात गोपाळगडाची सर्व कागदपत्र मिळवून 1960 सालीच गडाची विक्री झाल्याचे प्रकरण उघडकीस आणण्यात आले. गडाची खाजगी मालकी संपुष्टात यावी यासाठी चक्क स्वातंत्र्यदिनी रत्नागिरी जिल्हाधिका-यांच्या समोर आमरण उपोषण सुरू केलं होतं. उपोषणानंतर जिल्हा प्रशासन, पुरातत्व खाते जागे झाले असले तरी अजूनही लढा सुरूच आहे.
भोर येथील चंद्रोखर शेळके यांनी 2000 साली स्थापलेल्या रायरेश्वर प्रतिष्ठानच्या माध्यमातून रायरेश्वरावरील इतिहासप्रसिद्द महादेवाच्या मंदिराची डागडूजी आणि रंगरंगोटी करण्यात आली. येथील मुळ पुजारी असणा-या जंगमांना त्यांच्या जमीनी मिळवून दिल्या. प्रतिष्ठानने राजगडावर वीज पोहचविण्याचे देखील महत्वाचे काम केले. दुर्गसंवर्धनाच्या कामास नेटके स्वरूप यावे म्हणून प्रतिष्ठानने पुण्यातील इतिहास तज्ञ, गिर्यारोहण संस्था आणि स्थानिकांची अशी मिळून दूर्ग संवर्धन समितीच तयार केली आहे. त्या माध्यमातून किल्ले रोहीडावर श्रमदानाने गडाची वाट, सदर, मंदिर व तटबंदी अशा ठिकाणांची सफाईची कामे केली. विशेष म्हणजे गडाला पुरातन पदधतीचा मजबूत असा लाकडी दरवाजाच बसविला आहे. गडावर रखवालदार नेमून, त्याला संपर्काची साधनं दिली आहेत. तसेच गडावर विविध उत्सव साजरे करून गावक-यांना मोठा प्रमाणात त्यात सहभागी केले आहे.
कोल्हापूरकरांनी आपल्या परिसरातील रांगणा किल्ला निवडला आहे. निसर्गवेध या संस्थेने भगवान चिले यांच्या मार्गदर्शनाखाली गडावरील आकर्षक पण ढासळलेली दिपमाळ पुन्हा एक एक चिरा सांधून दिमाखात उभी केली आहे. गडावर दिशादर्शक व माहितीपर फलक बसविले आहेत. परिसरातील जंगलात आढळलेली अज्ञात समाधी, शिवपिंड व भग्नावस्थेतील नंदीची पुर्नप्रतिष्ठापना केली आहे. पावनखिंडीत शूर मावळयांच्या स्मृती जागविण्यासाठी व रणभूमीचे पावित्र्य जपण्यासाठी स्मारक उभे केले आहे.
गडकिल्ल्यांबाबत थोडी हटके वाटचाल केली आहे ती संभाजीराव भिडे गुरुजींच्या शिवप्रतिष्ठानने. जनसामान्यांचे वैभवाशाली इतिहासाचे प्रतिक असणा-या गडकोटांकडे लक्ष जावे याउद्देशाने 1985 पासून गडकोट मोहीमांचे आर्येजन सुरू केले. सुरवातीस असलेली सातआठशे गडप्रमींची संख्या आता चोविसाव्या मोहीमेवेळी तब्बल 22 हजारांवर पोहोचली आहे. शिवचरित्र घरोघरी पोहचावे या उद्देशाने फक्त छपाई खर्च घेउन राजा शिवछत्रपति हा ग्रंथ तब्बल 1 लाख घरात पोहचविला आहे. तर यासर्वावर कळस म्हणजे दुर्ग रायगडावर शिविछत्रपतींची समाधी, सिंहासन अशा सहा स्थळांच्या पुजेचे व्रत नित्यनियमाने गेली 17 वर्ष सांभाळले आहे.
गिरीकंदरी भटकतानाच साहसी वृत्तीला वाव मिळतो तो प्रस्तरारोहणातून आणि हिमशिखरे सर करण्यातून. त्यासाठीचे तांत्रिक शिक्षण घेउन भटकी मंडळी अशा मोहीमा यशस्वी करतात. आपले हेच कौशल्य समाजासाठी वेगळ्या प्रकारे उपयोगात आणले खोपोलीच्या यशवंती हायकर्सने. 1986 साली बोर घाटातील एका अपघात प्रसंगी माउंटन रेस्क्यूचे तंत्र वापरीत अपघातग्रस्तांची सुटका केली. मग ऑर्थर सीट महाबळेश्वर, इको पॉइपट माथेरान या व अशा तब्बल 25 ठिकाणी अपघतातील मृतदेह व जखमींची रेस्क्यूच्या तंत्राने सुटका केली. माळशेज घाट, कोकण कडा, माहुली किल्ला येथील अपघात प्रसंगी शिवगर्जना या कल्याणच्या संस्थेनं रेस्क्यू ऑपरेशन्स केली आहेत. मलंगगड व पेठ येथील अपघातात युगाचे कार्यकर्ते धाउन गेले होते तर आजोबा पर्वतावरील एका ट्रेकरचा दरीत पडून झालेल्या अपघातप्रसंगी शिवगर्जना, युगा, सॅक व गिरीविराजच्या गिर्यारोहकांनी एकत्रीत रेस्क्यू ऑपरेशन केले होते. पुण्यातील विविध संस्थांच्या गिर्यारोहकांनी तोरण्यावरील दोन

ट्रेकर्सच्या अपघातप्रसंगी मोलाची कामगिरी बजावली आणि सिंहगडावरील अपघातप्रसंगी गिरीप्रेमी संस्थेच्या गिर्यारोहकांनी रेस्क्यू ऑपरेशन केलं होतं.

गियर्यारोहकांनी नैसर्गिक आपत्तीप्रसंगीही आपले कर्तव्य निभावले आहे. 1988 च्या उत्तरकाशीतील भूकंपावेळी गिरीजनांच्या मदतीस पुण्याच्या गिरीप्रमी संस्थेने मोलाची मदत पुरविली. महाराष्ट्रात किल्लारी येथे झालेल्या भूकंपाच्या वेळी तर आज दिनांक व गिर्यारोहण महासंघाच्या माध्यमातून मुंबईतील पिनॅकल क्लब, युगा व इतर अनेक गिर्यारोहकांनी एकत्रीतपणे मदत पथक पाठविले होते. युथ हॉस्टेल अंबरनाथनं वैद्यकिय पथक पाठवलं होतं. भूज येथील भूकंपात नेचर लव्हर्सने मदतीचा हात दिला होता. अकोल्यात तर अजिंक्य ऍडव्हेंचर ग्रुपतर्फे डिझास्टर मॅनेजमेंटचे शास्त्राोक्त धडेच गेली 4 वर्ष गिरवले जात आहेत.

जुलै 2005 मध्ये महाराष्ट्रातल्या जलप्रकोपादरम्यान दुर्गम भागात रस्ते उखडल्यामुळे मदतच पोहचली नव्हती. तेव्हा पुण्याच्या गिरीप्रेमी संस्थेनी स्वरूपवर्धिनीच्या सहकार्याने महाडजवळील कुडपण गावी 250 घरांना धान्य व औषधे पोहचविली. चक्रम हायकर्सने महाड शहर, ओमळी व केवनाळे गावातील 300 घरांना जीवनावयक वस्तू पुरविल्या. बदलापुरात तर युथ हॉस्टेल अंबरनाथ युनीटच्या सुनील जोशी व सहका-यांनी महापुरात अडकलेल्या सुमारे 85 अबालवृद्धांना सुरक्षित स्थळी हलवले होते. अजिंक्य ऍडव्हेंचर अकोलानं 2006 च्या पुरात अकोल्यातील कित्येक नागरिकांना सुरक्षित स्थळी नेण्याचे कार्य यशस्वी केले होते. 1989 च्या जांभूळपाडाच्या महापुरात युथ हॉस्टेल अंबरनाथ, निसर्गमित्र व कित्येक गिर्यारोहकांनी मदतकार्य केले होते.

गिरीभ्रमंतीचा निखळ आनंद तर सुदृढ व्यक्ती अगदी सहजपणे मिळवीत असतात. परंतु शारिरीक व्यंग असणा-यांना देखील तो आनंद लुटता यावा या भावनेनेच यंग झिंगारोने 1982 सालापासून अंध अपंगांसाठी ट्रेक सुरू केले. त्याहीपुढे जाउन गिर्यारोहणाचे शास्त्राोक्त प्रशिक्षण दिले आणि हिमालयीन मोहीमापण यशस्वी केल्या. आज कल्पविहार सारखी संस्था 2005 पासून विविध गडकिल्ल्यांवर खास अंधांसाठी ट्रेक यशस्वीपणे आयोजित करीत आहे. अजिंक्य अडॅव्हेंचर अकोला या आपल्या अनोख्या गिरीमित्रांसाठी प्राक्षिण शिबिरे, ट्रेक, वाळवंटी ट्रेक असे अभिनव उपक्रम गेली 10 वर्ष यशस्वीपणे राबवित आहे. युथ हॉस्टेल अंबरनाथ युनिटनं सुश्रृषा व युगा संस्थेच्या मदतीने 70 अपंगांना रायगडची मोहीम करवून आणली तर काही जणांनी रॅपलींगचा अनुभव घेतला. रत्नागिरीतील मुकबधीर विद्यार्थी व केरळातील अनाथ मुलांसाठी पिनॅकल क्लबने मोफत गिर्यारोहण शिबिरे घेतली आहेत.

डोंगरात खुल्या निसर्गात स्वच्छंदी भटकणा-या भटक्यांना पर्यावरणाची जाणीव आपसूकच येते असं म्हंटलं तर फारसं वावगं ठरणार नाही. किंबहूना त्यामुळेच निसर्गमित्र सारख्या संस्थेची स्थापना होते तीच मुळी कर्नाळयाच्या वेताळमाळावर 600 झाडं लावून. तर नंतर याच कर्नाळयात 50 वनराई बंधारे घालून आपली पर्यावर्णाशी असलेली बांधीलकी वाढवली. निव्वळ डोंगरात, जंगलात कामं न करता निसर्गमित्रने त्याच बरोबर रायगड जिल्ह्यात जलसाक्षरता अभियानातून जनजागृतीचे काम केलं. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी बीएनएचएस च्या सहायाने पर्यावरण कार्याशाळा हा आणखीन एक नवा प्रकल्प निसर्गमित्रने याशस्वी केला आहे. महत्वाचं म्हणजे आपण रहातो तेथेपण ही बांधीलकी जपण्याच्या हेतूने पनवेलमधील बल्लाळेश्वर या ऐतिहासिक तळयातील काही भागातील गाळ उपसून त्याचे मरण थांबविले आहे.

नेचर लव्हर्सने चक्क 1600 वृक्षांची लागवड करून वांगणी येथे खास निसर्ग उद्यान उभारलं आहे. नॅशनल पार्कमधील 500 किलो कचरा साफ करून तेथे कचरा कुंडांची व्यवस्था संस्थेने केली आहे. दर महाशिवरात्रीला कान्हेरी गुहा परिसरात नो प्लास्टीक अभियान हा नेचर लव्हर्सचा एक नैमित्तीक उपक्रम. सुधागडावर तर क्षितीज ग्रुपने गेली 3 वर्ष अतिशय मेहनतीने वृक्षारोपणाचा प्रयोग यशस्वी केला आहे. गिरिविहारने सुधागडवरील शिबिरांच्या दरम्यान 1997 - 2004 पर्यंत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला आहे. गडकिल्ल्यांवरील अभियानात त्रिंगलवाडी किल्ला परिसरात शिवगर्जना कल्याण यांनी सलग 13 वर्ष केलेले वृक्षारोपण महत्वाचे ठरते.

अकोल्याच्या अजिंक्य ऍडव्हेंचरने अजिंक्य वृक्ष दत्तक योजना सुरू करून सुमारे 78 वृक्षांचे पालकत्व विविध कुटुंबांकडे दिले आहे. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत वाघ वाचवा मोहिमेत सहभाग, व्याघ्र कातडी जप्ती मोहीम व सामाजिक वनीकरण मोहिमांमध्ये अजिंक्यचा सहभाग महत्वाचा आहे. पिनॅकल क्लबने नव महाराष्ट्र युवा अभियान व हरियालीच्या माध्यमातून ठाणे व कल्याण परिसरात वृक्षारोपण केले आहे. तर युथ हॉस्टेल अंबरनाथ युनिटने त्रिंगलवाडी परिसरात 150 झाडं लावली आहेत.
डोंगरात भटकताना भटक्याला वाडावस्त्यांवरच्या प्रदुषणमुक्त, खुल्या निसर्गातील गावक-यांच्या जीवनाचे आकर्षण वाटत असते. पण स्वातंत्र्याच्या अर्ध शतकानंतर देखील तेथे प्राथमिक वैद्यकिय सोयी पुरेशा नसल्याचे जाणवते. याच जाणीवेतून विक्रोळीच्या गिरीमित्र प्रतिष्ठानने स्वयंम चॅरीटेबल ट्रस्टच्या सहकार्याने 2004 पासून दुर्गम भागातील वाडावस्त्यांवर सुमारे 17 वैद्यकिय शिबिरांचे आयोजन केले आहे. कुलंगडाच्या पायथ्याशी कुरुंगवाडीत, माहूलीच्या पायथ्याशी, चंदेरीच्या पायथ्याशी व पालघर डहाणू परिसरातील अंतर्गत भागात मिळून सुमारे 4800 गिरीजनांना औषधोपचार पुरविले आहे. पिनॅकलने घारापुरी, धसई, सोनावळे आशा सुमारे आठ शिबिरांमधून 2500 ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी व सुमारे महिनाभर पुरेल इतका औषधपुरवठा केलाय. इतकेच नाही तर रायगडवरील रॅपलिंग कॅम्पदरम्यान 4000 हजार लोकांमध्ये एडस् विषयी जनजागृतीचे काम केले आहे. युथ हॉस्टेल अंबरनाथ युनिटने जवळच्याच कांबा पठारावरील आदीवासी पाडय़ाच्या विकास कार्यक्रमात वृक्षारोपण, स्वच्छता , मोफत वैद्यकिय सुविधा तसंच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य असे चौफेर कार्यक्रम 1985 ते 1991 च्या कालावधीत यास्वी केले आहेत. डोंबीवलीच्या क्षितीजने सुधागडावरील कामाबरोबरच पायथ्याच्या पाच्छापूर गावात विद्यार्थ्यांसाठी वाचनालय सुरू केले आहे.
डोंगरद-या पार करताना गिरीजनांचे मुलभूत प्रश्न उमजलेल्या सतिश कोळवणकर यांनी एकांडय़ा शिलेदाराप्रमाणे ढाक किल्ल्याच्या पायथ्याशी विविध उपक्रम सुरू केले आहेत. पाण्याच्या मुलभूत प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी डॉ अजित गोखले यांच्या मार्गदर्शनाने 2006 पासून वनराई बंधा-याचे काम सुरू केले. दोन वर्षात परिणामकारक निकाल दिसल्यानंतर पंचायतीच्या माध्यमातून तळयाच्या बांधकामाची सुरवात केली तसेच 100 मीटर लांबीच्या 3 बंधा-यांचे काम प्रगतीपथावर आहे. गावातील तरूणांच्या सहकार्याने ढाक पर्यावरण संस्था स्थापन करून 100 झाडे लावण्यात आली.
द-या डोंगरात अभयारण्याच्या क्षेत्रात असणा-या आदिवासींच्या वस्त्यांपुढे पुनर्वसन हे एक दिव्यच असते. मेळघाटातील बोरी ,कोहा व कुंड या तीन पुनर्वसीत गावांच्या मदतीसाठी अकोल्याच्या अजिंक्य ऍडव्हेंचरनं मोफत वैद्यकीय शिबिरं व गाव हरितकरणाचे प्रकल्प यशस्वीपणे राबवले आहेत. मुरबाडनजीकचे भीमाशंकर अभयारण्यातील सिद्धगड माचीवरचे गाव असेच पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेले. जुलै 2005 च्या जलप्रकोपात काही रहिवासी आस-यासाठी खाली आले. कल्याणनजीकच्या रायता गावातील अश्वमेध प्रतिष्ठानने त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनदरबारी दिलेल्या लढयाला आता कुठे मुर्त स्वरुप मिळत आहे.
शासकिय योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे असाच आपला एक डोंगरमित्र बबन कडू हलाखीत होता. त्याला लिंगाणा माची गावाच्या स्थलांतरीत जागेत घर नव्हतं. महाडच्या डॉ राहूल वारंगेने सह्याद्रीमित्रच्या माध्यमातून बबनसाठी घर बांधण्याचा संकल्प केला. धुमकेतू ट्रेकर्स, चक्रम हायकर्स , निसर्गमित्र, निसर्गगिरीभ्रण, यंग ब्लड ऍडव्हेंचर, जिद्द सारख्या अनेक संस्था, व्यक्ती व गिर्यारोहकांनी मदत केली आणि या पावसाळयापूर्वी बबनला घर मिळालं देखील.
सामाजिक बांधीलकीसारखी थोडीशी अवघड वाटणारी संकल्पनादेखील आपल्या या भटक्यांनी समर्थपणे साकारली आहे. त्यांना माहित आहे की आपल्या प्रयत्नाने कदाचित खुप मोठे कार्य घडणार नाही, सामाजिक क्रांती वगैरेपण होणार नाही. तरीही त्यांने आपले काम नेटाने केले आहे, करीत आहेत व पुढेही करीत राहणार आहेत...

माणूस आणि माणूसकीचा, आपण दुवा सांधायचा
भटकंतीच्या निमित्ताने, माणूस माणसाशी बांधायचा
डोंगरद-या गडकिल्ले, पाऊलवाटा तुडवायच्या
एकेक पाऊल चढताना, अंतरातील गाठी सोटवायच्या
डोंगरकवेत करताना, आधार भक्कम करायचा
गडसेवा करण्यासाठी, हात हाती धरायचा
पर्यावरण ग्लोबल वॉर्मिंग, सगळं आपणंच बघयचं
वसुंधरेला वाचवण्यासाठी, आता आपण जगायचं
गिरिमित्रच्या माध्यमाने, सगळे आपण एक होऊ
निर्धार आणि ध्येयासक्तीची, चला आपण शपथ घेऊ.

********

माहिती संकलन, लेखन, संपादन व सादरीकरण टिम : सुहाज जोशी, धनंजय मदन, श्रद्धा तिसगावकर, हृषीकेश यादव.

कविता : विजय केशव पवार